दैनिक
लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ
LOK AARAMBH
dainiklokaarambh@gmail.com
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले
बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | सोमवार १३ ऑक्टोबर २०२५ | अंक २९१ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु


**आजचा दिनविशेष**


१९२९ : पुण्यातील पार्वती देवस्थान दलितांसाठी खुले करण्यात आले.


SUN Tourism International Pvt. Ltd. Since 2007
All Tours घर से घर तक — दिल से दिल तक
www.suntourismpune.in
सन टुरिझम
प्रस्तुत करते
देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय ग्रुप टूर्स !
आमच्या विशेष टूर पॅकेजेस
काश्मीर, वैष्णोदेवी, नैनीताल, शिमला, अयोध्या ग्रँड युरोप, ऑस्ट्रेलिया, जपान, दुबई, श्रीलंका व्हिएतनाम, सिंगापूर, थायलंड, बाली
आता आपल्या स्वप्नांच्या सहलींची नोंदणी करा...
-: अधिक माहितीसाठी संपर्क :-
99222 22272 / 7602727555


# महाराष्ट्रात पुन्हा अस्मानी संकट, 15 ऑक्टोबरला काय होणार ? IMDचा अलर्ट

यावर्षीच्या मान्सून हंगामाच्या शेवटच्या टप्प्यातही महाराष्ट्रात मान्सूनचा पाऊस कमी होण्याची चिन्हे दिसत नाहीत. मे महिन्याच्या अखेरीपासून राज्यात पावसाने जोरदार हजेरी लावली आहे. त्यानंतर जून, जुलै मध्ये मध्यम पाऊस तर ऑगस्टमध्ये पावसाने कहर केला. सप्टेंबरमध्ये मान्सूनचा जोर कमी होईल अशी अपेक्षा होती, परंतु या काळात विदर्भ आणि मराठवाड्यासह अनेक जिल्ह्यांमध्ये मुसळधार पाऊस कोसळा. अतिवृष्टीमुळे पूरसदृश परिस्थिती निर्माण झाली. त्यामुळे हजारो शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले, घरात-दारांत पाणी शिरलं, पिकं पाण्याखाली आली, शेतजमीन खरडून गेली, गुरु वाहून गेली, घर-संसार उघड्यावर केला. आता, ऑक्टोबरच्या सुरुवातीला नैऋत्य मान्सून निघून जाईल अशी अपेक्षा होती. मान्सूनच्या परीतचा प्रवास सुरू झाल्याचेही वृत्त समोर आले होते. मात्र तेवढ्यात हवामानविषयी एक मोठी अपडेट समोर आली आहे. हवामान खात्याने एक नवीन इशारा जारी केला आहे. ताज्या अहवालानुसार, 15 ऑक्टोबरपासून राज्यात मुसळधार पावसाची (Thunderstorm) आणखी एक फेरी सुरू होऊ शकते. सरकारचे





**शेतकऱ्यांना आवाहन**

या संभाव्य पावसाच्या पार्श्वभूमीवर, राज्य सरकारने शेतकऱ्यांना कापणी केलेले पीक सुरक्षित ठिकाणी ठेवण्याचे आणि पाऊस किंवा जोरदार वाऱ्यापासून संरक्षण करण्यासाठी तयारी करण्याचे आवाहन केले आहे. विदर्भ, मराठवाडा आणि मध्य

**महाराष्ट्रात मुसळधार पावसाची शक्यता**

हवामान खात्याने दिलेल्या माहितीनुसार, 15 ते 18 ऑक्टोबर दरम्यान विदर्भ, मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रात दुपारी मुसळधार पाऊस आणि गडगडाटासह पाऊस पडण्याची शक्यता आहे. काही भागात विजांचा कडकडाट देखील होऊ शकतो.

खान्देश आणि पश्चिम महाराष्ट्रातही कोसळणार पाऊस एवढंच नव्हे तर खान्देश आणि पश्चिम महाराष्ट्रातही मुसळधार पावसाची शक्यता आहे. गेल्या काही दिवसांपासून राज्यातील अनेक भागात हवामान पूर्णपणे कोरडे होते, ज्यामुळे मान्सूनचा राज्यातून परतीचा प्रवास झाल्याचे बोलले जात होते. मात्र, आता नव्या अपडेट्सनुसार, हवामानात अचानक बदल होण्याची शक्यता आहे.

मुंबई आणि पुण्यासह मराठवाड्यात मुसळधार पावसानंतर, पावसाळा ऑक्टोबरमध्ये संपेल अशी अपेक्षा होती. मुंबईत, हवामान खात्याने अधिकृतपणे मान्सूनच्या प्रस्थानाची घोषणाही केली. 2 ऑक्टोबरपर्यंत राज्याच्या अनेक भागात अधूनमधून पाऊस सुरू होता. सुरुवातीला असा अंदाज वर्तवण्यात आला होता की 5 किंवा 6 ऑक्टोबरपर्यंत मान्सून पूर्णपणे माघार घेईल. आता पुन्हा एकदा राज्यात विजांचा कडकडाट, मेघगर्जनेसह आणि जोरदार वाऱ्यासह पाऊस पडण्याची शक्यता आहे, त्यामुळे शेतकरी आणि नागरिकांनी सतर्क राहण्याचा इशारा देण्यात आला आहे.

# आ. संदीप क्षीरसागर यांच्या पाठपुराव्याला यश

शहरातील बायपास वळणावर दोन पुलांची बांधणी आणि स्लिप सर्विस रस्ता जोडणीच्या कामाला सुरुवात

बीड दि.१२ (प्रतिनिधी) बीड शहरातून जात असलेल्या आणि उत्तर दक्षिण जोडणारा धुळे सोलापुर महामार्गावर मोठ्या प्रमाणात वाहतूक असते. यात जड वाहतकीचे प्रमाण देखील जास्त असते. धुळे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर बायपास रस्त्यावरील शहरात वळणावर नेहमी अपघात होत होते. यामुळे संभाव्य अपघात टळले पाहिजेत आणि नागरिकांचे जीव वाचले पाहिजेत त्यामुळे या वळणावर पुलांची बांधणी आणि स्लिप सर्विस रस्त्याची जोडणी अत्यंत महत्त्वाची होती. त्या दोन्ही ठिकाणी पुलांची बांधणी व १२ किलोमीटर च्या रस्त्यावर स्लिप सर्व्हिस रस्ता जोडणीच्या कामाला प्रत्यक्षात सुरूवात झाली. या कामासाठी आ.संदीप क्षीरसागर यांनी केंद्रीय रस्ते विकासमंत्री नितीन गडकरी यांच्याकडे पाठपुरावा केला होता. बीड विधानसभेचे आ.संदीप भैया क्षीरसागर यांनी या सुरू झालेल्या कामाच्या ठिकाणी जाऊन पाहणी केली. यावेळी त्यांनी कामासंदर्भात संबंधित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना योग्य त्या सूचना करत व सुरू झालेले काम लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी सूचना दिल्या.

# ज्ञान आणि कल्पकतेचा संगम गुरुकृपा महाविद्यालयात राज्यस्तरीय भित्तीपत्रक सादरीकरण स्पर्धा

फार्मसी विद्याशाखेमध्ये लोकप्रिय असलेल्या राज्यस्तरीय भित्तीपत्रक सादरीकरण (पोस्टर प्रेझेंटेशन) स्पर्धेचे आयोजन गुरुकृपा इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, माजलगाव महाविद्यालयात भव्य स्वरूपात करण्यात आले. या वेळी महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यातील फार्मसी कॉलेज मधील विद्यार्थ्यांनी यात सहभाग नोंदवला.

सदरील कार्यक्रमाचे उद्घाटन गुरुकृपा सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष डॉ. यशवंत राजेभोसले यांनी केले या कार्यक्रमासाठी ग्लेनमार्क फार्मास्युटिकल या नामांकित औषधी कंपनीचे मुख्य संशोधक वैज्ञानिक श्री अलकेश कासलीवाल यांची खास प्रमुख उपस्थिती लाभली. भित्तीपत्रकाचे निरीक्षणे संपल्यानंतर येथे पारितोषिक वितरण समारंभ पार पडला यात डीफॉर्मसी आणि बीफार्मसी विभागात स्वतंत्र पाच हजार, तीन हजार, दोन हजार रोख व सन्मानचिन्ह बक्षीस देण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक गुरुकृपाचे




प्राचार्य अमित बिंदू यांनी केले तसेच संस्थेचे अध्यक्ष डॉ. यशवंत राजेभोसले यांनी मंचावरून सहभागी विद्यार्थ्यांशी संवाद साधला यावेळी पुरुषोत्तम करवा, सुभाष नाकलगावकर, हरीश यादव आदी पत्रकार उपस्थित होते.

# मराठा सेवा संघ, संभाजी ब्रिगेडने छत्रपतींचा खरा इतिहास सांगितला–संकेत पाटील

## किनवट येथे संभाजी ब्रिगेडची आढावा बैठक संपन्न

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट किनवट : संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष अँड. मनोज आखरे महासचिव सौरभ खेडेकर संपर्कप्रमुख गजानन भोयर यांच्या आदेशाने नांदेड जिल्ह्यातील १६ ही तालुक्यांचा आढावा व तालुका अध्यक्ष पदासाठी मुलाखती दौरा सुरू असून १२-ऑक्टोबर रोजी शासकीय विश्रामगृह गोकुंदा येथे किनवट तालुक्याची आढावा बैठक मराठा सेवा संघाचे तालुकाध्यक्ष प्रा.दगडू भरकड यांच्या अध्यक्षतेखाली तसेच संभाजी ब्रिगेडचे विभागीय अध्यक्ष संकेत पाटील जिल्हाध्यक्ष सुभाषराव कोल्हे जिल्हाध्यक्ष कमलेश कदम, जिल्हा प्रसिद्धी प्रमुख बालाजी सिरसाट यांच्या उपस्थितीत घेण्यात आली. संभाजी ब्रिगेडच्या कार्यकर्त्यांनी गाव तिथे शाखा घर तिथे कार्यकर्ता तयार करून मराठा सेवा संघ संभाजी ब्रिगेडच्या विचारायची पेरणी करावी, मराठा सेवा संघ संभाजी ब्रिगेडच्या स्थापनेपासून वैचारिक चळवळ निर्माण झाली आणि महाराष्ट्रातले जाती- जातीतील भांडणे, संपुष्टात आले, छत्रपतींचा खरा इतिहास चळवळीने समोर आणून अनेक अभ्यासक विचारवंत लेखक तयार केल्याचे मत विभागीय अध्यक्ष संकेत पाटील यांनी व्यक्त केले. संभाजी ब्रिगेडच्या कार्यकर्त्यांनी पक्ष वाढीसाठी तसेच शेतकऱ्यांचे विद्यार्थ्यांचे प्रश्न सोडविण्यावर भर द्यावा तसेच संभाजी ब्रिगेडच्या विविध आघाड्यामधून कार्याचा प्रचार प्रसार करावा, कार्यकर्त्यांच्या येणाऱ्या अडीअडचणी साठी आम्ही कायम सोडवण्यासाठी तत्पर असल्याचे मत जिल्हाध्यक्ष सुभाषराव कोल्हे ,कमलेश कदम यांनी कार्यकर्त्यांना आश्वासित केले.




प्रारंभी राष्ट्रमाता राजमाता माँसाहेब जिजाऊ कुळवाडी भूषण छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.कार्यक्रमाच्या प्रास्ताविकतेतून संभाजी ब्रिगेड पक्ष स्थापनेपासून लढवलेल्या निवडणुका ज्यात जिल्हा परिषद पंचायत समिती विधानसभा लोकसभा लढवलेला पक्षाच्या कार्यकर्त्यांचा अनुभव तसेच मराठा आरक्षण, शेतकऱ्यांचे, विद्यार्थ्यांचे, शिक्षकांच्या न्याय हक्कासाठी वेळोवेळी केलेल्या आंदोलनाचा अनुभव जिल्हा प्रसिद्धी प्रमुख बालाजी सिरसाट यांनी व्यक्त केला. सचिन कदम यांनी आपल्या कार्यकाळातील पूर्ण आढावा तसेच समोरील तालुका अध्यक्ष पदासाठी मुलाखतदेत आपले विचार मांडले. शहराध्यक्ष पदासाठी सुमित माने शेतकरी आघाडीसाठी प्रदीप कोल्हे, तसेच ग्रामीण भागातून विशाल शिंदे यांनी काम करण्याची इच्छा कार्यकारणी समोर व्यक्त केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार ज्ञानेश्वर कदम यांनी मानले. यावेळी ज्ञानेश्वर पवार ,मराठा सेवा संघाचे जनार्दन काकडे, शामराव फाळके, सुशील कदम ,राजेश कदम, समाधान उटकर,अरविंद सूर्यवंशी,आकाश इंगोले,रितेश मंत्री, चंद्रकांत साळवे सदानंद पांचाळ ,सोपान शिंदे श्रीकांत बेंद्रे, निरंजन मिराशे,रोहित केसरे यांच्यासह संभाजी ब्रिगेडचे आजी-माजी पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वैचारिक लोकांनी राजकारणात सक्रिय सहभाग घेत प्रत्येक सभागृहात जायला हवं

## चांगली माणसं बाजूला गेली तर लोकशाही धोक्यात येईल - सेवकराम जाधव

परळी वैजनाथ : राजकारण पैसेवाल्यांचं.. राजकारण गुंडापुंडांचं असं म्हणून दूर न राहता, वैचारिक लोकांनी प्रत्येक सभागृहात जाणे आवश्यक आहे. चांगल्या विचाराच्या नागरिकांनी राजकारणा पासून दूर न जाता सक्रिय सहभाग नोंदवण्याची गरज निर्माण झाली असल्याचे मत सामाजिक कार्यकर्ते सेवकराम जाधव यांनी व्यक्त केले आहे.

सद्यपरिस्थितीमधे राजकीय पटलावर पैसेवाले व गुंडप्रवृत्तीचे लोक जास्त प्रमाणात दिसून येतात. त्याकारणाने वैचारिक विचारधारा असणारी माणसं राजकारणापासून साहजिकच दूर जात आहेत. आपलं हे क्षेत्र नाही असं म्हणत सक्रिय सहभाग घेण्यास धजावत नाहीत. प्रत्येक निवडणुकीत असंच होत गेलं, चांगली माणसं पूर्णपणे बाजूला



फेकली गेली तर येणाऱ्या काळात खूप मोठे धोके निर्माण होतील.

समाजहिताचे भान असलेली वैचारिक माणसं अनेक क्षेत्रात आहेत. सभागृहात प्रत्येक क्षेत्रातील अभ्यासकांची आवश्यकता आहे. नगर परिषद, पंचायत समिती, जिल्हा परिषद अशा ठिकाणी समाजसेवक, पत्रकार, साहित्यिक,विचारवंत, शिक्षक, व्यापारी, शेतकरी यासह विविध घटकांचे तत्वशील प्रतिनिधी सभागृहात असायला हवेत. त्याशिवाय लोकहिताची कामं होणार नाहीत.

म्हणून वैचारिक लोकांनी राजकारणा पासून दूर न जाता सक्रिय सहभाग घेत प्रत्येक सभागृहात जाणं आवश्यक आहे. चांगली माणसं बाजूला गेली तर लोकशाही धोक्यात येईल. असे मत सामाजिक कार्यकर्ते सेवकराम जाधव यांनी व्यक्त केले आहे.

# वेदिका रेवन सुरवसे वाढदिवसाच्या निमित्ताने सिंधुताई सपकाळ अनाथ आश्रमाला अन्नदान



पुणे प्रतिनिधी :- वाढदिवस म्हटलं की हजार रुपये खर्च पण सुरवसे परिवाराने एक आगळावेगळा निर्णय घेतला त्यांनी गोरगरिबाण मुलांना व तसेच सिंधुताई सपकाळ अनाथ आश्रम येथील मुलांना अन्नदान सेवा केली व तेथेच वाढदिवस साजरा करण्यात देखील आला,

# हुतात्मा देवराव विद्यालयाचा कॉपीमुक्तचा संदेश!

## प्रथम सत्र परीक्षा कॉफीमुक्त ; भविष्यकाळात विद्यालय आदर्श असेल - प्राचार्य राम वनवे



पाटोदा | प्रतिनिधीपाटोदा तालुक्यातील भायाळा येथील हुतात्मा देवराव माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालयात कॉफीमुक्त प्रथम सत्र परीक्षा घेण्यात आली. विद्यार्थ्यांनी देखील प्रतिसाद देत कॉफी न करण्याचा संकल्प केला. कॉफीमुक्त वातावरणात प्रथम सत्र परीक्षा संपन्न होत आहे. विद्यालयातील उपक्रम हे राबवणं अमलात आणणं एवढे गरजेचे आहे तेवढेच कॉफीमुक्त करून विद्यार्थ्यांना स्वावलंबी करणे महत्त्वाचे आहे. हुतात्मा देवराव माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालयात कॉफी मुक्त परीक्षा घेण्याचा संकल्प प्राचार्य राम वनवे सर यांनी सर्व शिक्षक विद्यार्थ्यांसमोर मांडला आणि सर्व शिक्षक व विद्यार्थ्यांनीही प्रतिसाद देत प्रथम सत्र परीक्षा कॉपीमुक्त वातावरणात देण्याचा ठरवलं आणि मोठा प्रतिसाद दिला. विद्यार्थ्यांनी ही पुढची तयारी म्हणून कॉफी न करण्याचा संकल्प करून शिक्षकांना मोठा प्रतिसाद दिला आहे. भविष्यकाळात हुतात्मा देवराव विद्यालय आदर्श ठरेल असं काम संस्था अध्यक्ष सहकार महर्षी रामकृष्ण बांगर साहेब, संस्था सचिव तथा सरपंच सौ. सत्यभामाताई बांगर, युवा नेते विजयसिंह बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व शिक्षक वर्ग करत आहेत असे प्राचार्य राम वनवे सर यांनी सांगितले आहे.

### हुतात्मा देवराव विद्यालयाच्या उत्कृष्ट नियोजनातून आदर्श वाटचाल

हुतात्मा देवराव माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालयात प्रथम सत्र परीक्षेत कॉफी मुक्ताचा संदेश देत आदर्श संकल्प करून आदर्श वाटचाल सुरू केली आहे. यासाठी संस्था अध्यक्ष सहकार महर्षी रामकृष्ण बांगर साहेब, सचिव तथा सरपंच सौ. सत्यनामाताई बांगर, युवानेते विजयसिंह बांगर यांचे मोलाचे मार्गदर्शन मिळत असून विद्यालयाचे प्राचार्य राम वनवे सर यांच्या नियोजनातून नागरगोजे सर, मुळे सर, काळुसे सर, बागडे सर, पाटील सर, जावळे सर, कदम सर, श्रीमती केंगार मॅडम, काळे सर, प्रा. कोल्हे सर, प्रा.नाईकवाडे मॅडम, प्रा.पवार सर, प्रा.जामकर सर, प्रा.वारभुवन मॅडम, बांगर सर, पाखरे सर, दिनेश बांगर, सोनवणे मामा यांच्या उत्कृष्ट आयोजन नियोजनातून विद्यालयाची वाटचाल प्रगतीकडे होताना दिसत आहे..

दैनिक लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
सोमवार १३ ऑक्टोबर २०२५
https://lokaarambh.com



संपादकीय

## ब्रेड खाल्ल्याने खरंच कर्करोग होतो का? आरोग्य तज्ज्ञ काय सांगतात?



आजकाल धावपळीच्या जीवनशैलीमुळे ना झोप पूर्ण होत आहे , ना शरीराला गरजेचे असणारे पोषक घटक मिळत आहे. खाण्याच्या वेळांपासून ते झोपण्याच्या वेळांपर्यंत सर्वच नियोजन बिघडलं आहे. चुकीच्या खाण्याच्या सवयींचा देखील आपल्या आरोग्यावर थेट परिणाम होतो. त्यामुळे कमी वयातच लोक मधुमेह आणि रक्तदाबासह अनेक आजारांना बळी पडत आहेत. पण आजकाल सोशल मीडियावरील असही म्हटलं जात आहे की ब्रेड खाल्ल्याने कर्करोग होऊ शकतो. आता प्रश्न असा आहे की त्याचे सेवन खरोखरच कर्करोग होऊ शकते का? कारण जवळपास अनेकांच्या घरात ब्रेड खाल्ला जातो. त्यामुळे अशा परिस्थितीत तज्ज्ञांकडून हे जाणून घेऊयात की खरंच ब्रेड खाल्ल्याने कर्करोग होतो का? कर्करोग सर्जन डॉ. जयेश कुमार म्हणतात की ब्रेडमधून कर्करोग होण्याची दोन प्रमुख कारणे असू शकतात. पहिले म्हणजे ते ॲक्रिलामाइड तयार करते. प्राण्यांना ॲक्रिलामाइड खूप जास्त प्रमाणात दिल्याने कर्करोग होतो हे दिसून आले आहे. तथापि, मानवांमध्ये त्याच्या घटनेचा अद्याप कोणताही पुरावा नाही. अशा परिस्थितीत, ते कमी प्रमाणात सेवन करणे किंवा संतुलित पद्धतीने आहारात समाविष्ट करणेच चांगले. कोणत्याही गोष्टीचे जास्त सेवन आरोग्यासाठी हानिकारकच असते. डॉ. जयेश म्हणतात की ब्रेडमध्ये तयार होणाऱ्या ॲक्रिलामाइडचे प्रमाण दीर्घकाळात मानवांमध्ये कर्करोगाचे कारण बनते याचा कोणताही पुरावा अद्याप तरी सापडलेला नाही. कोणते ब्रेड खाण्यास चांगले आहे?आजकाल मार्केटमध्ये ब्रेडमध्येही अनेक प्रकार आलेले पाहायला मिळतात. डॉ. जयेश यांच्या म्हणण्यानुसार संपूर्ण गहू आणि मल्टीग्रेन ब्रेड पांढऱ्या ब्रेडपेक्षा थोड्याफार प्रमाणात चांगला ठरू शकतो. पण या ब्रेडचे जास्त प्रमाणात सेवन करणे टाळावे. गॅसवर थेट भाजलेली चपाती किंवा रोटी खाल्ल्याने कर्करोग होतो का?आता, लोकांना अजून एक भीती सतावते आहे की गॅसवर चपाती, रोटी भाजल्याने कर्करोग होऊ शकतो. लोकांचा असा विश्वास आहे की गॅसवर चपाती, रोटी भाजल्याने रोटीमध्ये रसायने मिसळली जातात ज्यामुळे कर्करोग होऊ शकतो. पण याबद्दल डॉ. जयेश कुमार यांनी म्हटलं आहे की, गॅसवर चपाती, रोटी भाजल्याने कर्करोग होण्याची शक्यता पूर्णपणे कमी आहे कारण सर्व रसायने जाळल्यानंतर हवेत वाष्पीकरण होतात. हा पण ते जळलेली चपाती, रोटी खाणे टाळण्याचा सल्ला देतात. कारण ते आरोग्यासाठी हानिकारक असू शकते.

# ज्या शेतकऱ्यांनी पिकवलेले अन्न एवढे वर्षे खाल्ले त्यांच्या उध्दारासाठी यापूढे काम करणार – मयंक गांधी

परळी वैजनाथ (प्रतिनिधी) शेतकरी राबराब राबतात, शेतात घाम गाळतात आणि त्यानंतर त्यांनी पिकवलेले अन्नधान्य जगाला जगवते, म्हणूनच त्याला जगाचा पोशिंदा म्हटले जाते. मीही आयुष्याची एवढी वर्षे शेतकऱ्यांनी पिकवलेले अन्नधान्य खाल्ले आहे. या ऋणातून उतराई होण्यासाठी मी उरलेले आयुष्य खर्च करणार असून, शेतकऱ्यांच्या उत्पन्न वाढीसाठी काम करणार असल्याचे प्रतिपादन ग्लोबल विकास ट्रस्टचे अध्यक्ष मयंक गांधी यांनी केले. परळी वैजनाथ तालुक्यातील मौजे बोरखेड तसेच तेलसमुख येथे पुरपरिस्थितीमुळे नुकसान झालेल्या शेतकरी कुटूंबांना किराणा किटचे वाटप करण्यात आले, याप्रसंगी ते बोलत होते. परळी वैजनाथ तालुक्यातील मौजे बोरखेड तसेच तेलसमुख येथे पुरग्रस्त शेतकरी कुटूंबांना ग्लोबल विकास ट्रस्टकडून किराण किटचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी दोन्हीही गावातील शेकडो नागरीकांची मोठ्या संख्येने उपस्थितीती होती. परंपारीक शेतीत बदल करून कुठेतरी आता शाश्वत शेतीकडे वळण्याची गरज निर्माण झालेली आहे. सोयाबीन, कापूस, ऊस आदी पिके ही घ्यायची म्हणून शेतकरी घेतात, मात्र हिशोब केला तर त्यातून कवडीचेही उत्पन्न मिळत नाही. वर्षानुवर्षे तोट्यातील शेतकरी कर्जाच्या अगदी खाईत जात आहेत. त्यावर उपाय म्हणून केळी, अंबा, सिताफळ, तुती अशा पिकांकडे शेतकऱ्यांनी वळले



पाहीजे. ग्लोबल विकास ट्रस्टकडून महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना फळबाग लागवडीबाबत मोफत प्रशिक्षण देण्यात येते. आजघडीला जवळपास ३० हजार पेक्षा जास्त शेतकरी ग्लोबल विकास ट्रस्टसोबत जोडल्या गेलेले आहेत. त्या सर्व शेतकऱ्यांच्या कुटूंबाची अर्थव्यवस्था पूर्वीपेक्षा जास्त सुधारली असून, आज ते समाधानी जीवन जगत आहेत. येणाऱ्या काळात फळपिक लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांना आवश्यक असलेली सर्वतोपरी मदत करण्याचा आमचा संकल्प असून, शेतकऱ्यांनी सिरसाळा येथील कृषीकूलमध्ये यावे. तेथील उपलब्ध सर्व बाबींचा अभ्यास करावा आणि येणाऱ्या काळात फायदा करून घ्यावा असे आवाहन ग्लोबल विकास ट्रस्टचे अध्यक्ष मयंक गांधी यांनी शेतकऱ्यांना केले आहे. ३ हजारपेक्षा जास्त शेतकरी कुटूंबांना किराणा किटचा मिळतोय लाभ! ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टीने शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले. शेतातील पिके वाहून गेली, पिकांसोबत शेतातील मातीही वाहून गेल्याने पुढील किमान तीन वर्षे त्या शेतीतून उत्पन्न मिळू शकणार नाही. अशा अवस्थेत शेतकऱ्यांनी जगायचे कसे? असाच मोठा प्रश्न निर्माण झालेला आहे.

# परळीच्या जलतरणपटूंची राज्यस्तरीय शालेय स्पर्धेसाठी निवड

परळी वैजनाथ (प्रतिनिधी):परळी तालुक्यातील जलतरणपटूंनी आपली दमदार कामगिरी कायम ठेवत यंदाही अभिमानास्पद यश संपादन केले आहे. छत्रपती संभाजीनगर येथे नुकत्याच पार पडलेल्या शालेय विभागीय जलतरण स्पर्धेत परळी तालुक्यातील चार जलतरणपटूंनी उल्लेखनीय कामगिरी करत सर्वांचे लक्ष वेधले. त्यापैकी तीन जलतरणपटू राज्यस्तरीय शालेय स्पर्धेसाठी पात्र ठरले असून चौथ्या जलतरणपटूने देखील उत्तम कामगिरी नोंदवली आहे. कु. आभा गणेश मुंडे, चि. वरद श्रीराम लांडगे, आणि कु. सिद्धी रमेश चाटे यांनी राज्यस्तरीय स्पर्धेसाठी पात्रता मिळवली आहे. तर कु. राजनंदिनी प्रकाश चाटे हिने 100 आणि 200 मीटर फ्रीस्टाइल प्रकारात विभागीय स्तरावर तृतीय क्रमांक पटकावत परळी तसेच बीड जिल्ह्याचा मान उंचावला आहे. छत्रपती संभाजीनगर येथील सिद्धार्थ जलतरण तलावावर पार पडलेल्या या विभागीय स्पर्धेत परळीतील जलतरणपटूंची कामगिरी खालीलप्रमाणे ठळक ठरली — कु. आभा गणेश मुंडे (विद्यावर्धिनी शाळा) – 100 मीटर बटरफ्लाय प्रकारात प्रथम क्रमांक चि. वरद श्रीराम लांडगे (न्यू हायस्कूल) – 50 मीटर ब्रेस्ट स्ट्रोक प्रथम क्रमांक कु. सिद्धी रमेश चाटे (विवेकवर्धिनी विद्यालय) – 50 मीटर बॅकस्ट्रोक, फ्रीस्टाइल आणि ब्रेस्ट स्ट्रोक प्रकारात प्रथम व द्वितीय क्रमांक कु. राजनंदिनी प्रकाश चाटे (विद्यावर्धिनी शाळा) – 100 आणि 200 मीटर फ्रीस्टाइलमध्ये तृतीय क्रमांक या चारही जलतरणपटूंनी चिकाटी, नियमित सराव आणि उत्कृष्ट तंत्रज्ञानाच्या बळावर हे यश मिळवले. त्यांना झी लिटरा माउंट स्कूल येथील स्विमिंग पूलचे कोच संजय भगत सर यांनी मार्गदर्शन केले. तसेच न्यू हायस्कूलचे क्रीडा शिक्षक नारायण वानखेडे सर, विद्यावर्धिनी शाळेचे विजय मुंडे सर, हंगरगे सर आणि कदम सर यांच्या मोलाच्या सहकार्याने जलतरणपटूंनी या यशाची शिखरे गाठली. या उत्कृष्ट कामगिरीमुळे हे जलतरणपटू आता आगामी राज्यस्तरीय शालेय जलतरण स्पर्धेत संभाजीनगर विभागाचे प्रतिनिधित्व करणार आहेत. या चारही जलतरणपटूंच्या यशाबद्दल शाळा, पालक, क्रीडा शिक्षक व क्रीडा क्षेत्रातील मान्यवरांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



# आंतरराष्ट्रीय पत्रकार संघटना व्हॉईस ऑफ मिडिया चे राज्य अधिवेशन पंढरपूरमध्ये.

## राज्यातील अडीच हजार पत्रकार होणार सहभागी, ज्येष्ठ पत्रकार व राजकीय मान्यवरांची उपस्थिती.

वडवणी (प्रतिनिधी) महाराष्ट्रातून सुरू झालेली आंतरराष्ट्रीय पत्रकार संघटना 'व्हॉईस ऑफ मीडिया' आणि 'व्ही.ओ.एम. इंटरनॅशनल फोरम' आज ५६ देशांपर्यंत पोहोचली असून तब्बल ६ लाख ७० हजार पत्रकार या संस्थेमध्ये पदाधिकारी म्हणून कार्यरत आहेत. पत्रकारांसाठी जगभरात निर्माण झालेली ही केवळ एक सामाजिक चळवळ नसून, पत्रकारांना सक्षम करण्यासाठीचे मोठे व्यासपीठ ठरले आहे. पत्रकारांचे निवास, आरोग्य, संरक्षण यांसारखे मूलभूत प्रश्न सोडवणे तसेच पत्रकारितेची गुणवत्ता आणि



व्यावसायिकता उंचावण्याचे काम या व्यासपीठातून घडून आले आहे. देशभरातील पत्रकारांनी पत्रकारांसाठी उभारलेले हे एक ऐतिहासिक व्यासपीठ आहे. या क्रांतिकारी चळवळीच्या पार्श्वभूमीवर व्हॉईस ऑफ मीडिया आणि व्ही.ओ.एम. इंटरनॅशनल फोरमचे राज्य अधिवेशन यंदा शनिवार दि.१५ आणि रविवार दि.१६ नोव्हेंबर २०२५ रोजी श्री श्री राधा पंढरीनाथ मंदिर, इस्कॉन पंढरपूर येथे सकाळी ९ ते रात्री ११ यावेळेत संपन्न होत आहे. अशी माहिती संघटनेचे आंतरराष्ट्रीय अध्यक्ष संदीप काळे यांनी पंढरपूर येथे झालेल्या पत्रकार परिषदेत दिली. या अधिवेशनासाठी इस्कॉनचे सर्वश्री. प्रल्हाद दास महाराज, श्री.परमात्मा दास व श्री.शंकरदास महाराज यांचे सहकार्य लाभणार आहे. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय मान्यवरांसह महाराष्ट्रातील प्रमुख पदाधिकारी या अधिवेशनात सहभागी होणार आहेत. एकूण अडीच हजार पत्रकारांचा सहभाग अपेक्षित आहे.पत्रकारांच्या सर्वांगीण विकासासाठी हे अधिवेशन महत्त्वाचे ठरणार असून, विविध मान्यवरांच्या विशेष मुलाखतीचे आयोजन करण्यात आले आहे. लोकशाहीचा आधारस्तंभ असलेली पत्रकारिता अधिक सक्षम आणि अबाधित कशी राहील, यावर या अधिवेशनात सखोल चर्चा होणार आहे. अनेक राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय पत्रकार आणि अनेक राजकीय मंडळी यांना या अधिवेशनासाठी खास निमंत्रित केले आहे.

# ऑल इंडिया पँथर सेनेच्या वतीने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत राखीव जागांसाठी जोरदार तयारी

## निष्ठावंत कार्यकर्त्यांना न्याय देऊ– जिल्हाध्यक्ष नितीन सोनवणे





बीड, दि. १२ ऑक्टोबर २०२५ : दलित आणि वंचित, बहुजन घटकांच्या हक्कांसाठी लढणारी ऑल इंडिया पँथर सेना आता महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत सक्रिय भूमिका घेणार आहे. राष्ट्रीय अध्यक्ष दीपक भाई केदार यांच्या आदेशानुसार आणि महाराष्ट्र प्रवक्ता व बीड जिल्हाध्यक्ष नितीन सोनवणे यांच्या नेतृत्वाखाली बीड जिल्ह्यातील सर्व राखीव जागांसाठी जोरदार लढा दिला जाणार असल्याचे जाहीर करण्यात आले आहे. संघटनेतील पदाधिकाऱ्यांनी तात्काळ तयारी सुरू करण्याचे आवाहन करून नितीन सोनवणे यांनी कार्यकर्त्यांना सूचना दिल्या आहेत. जिल्ह्यातील जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि नगरपालिका निवडणुकांमध्ये राखीव असलेल्या सर्व जागांवर पँथर सेनेचे उमेदवार उभे केले जातील, असे सोनवणे यांनी स्पष्ट केले. "वंचित समाजाच्या हक्कांसाठी आम्ही राजकीय पटावर मजबूत उपस्थिती नोंदवणार आहोत. पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी आता तयारीला लागावे," असे ते म्हणाले. ऑल इंडिया पँथर सेना ही दलित पँथर चळवळीच्या वारशावर उभी असलेली संघटना असून, दीपक भाई केदार यांच्या नेतृत्वाखाली ती देशभर कार्यरत आहे. बीड जिल्ह्यातील कार्यकर्ते याबाबत उत्साही असून, लवकरच रणनीतीबाबतचे आढावा बैठका घेतल्या जाणार आहेत. असे ऑल इंडिया पँथर सेनेचे महाराष्ट्र प्रवक्ता तथा बीड जिल्हाध्यक्ष नितीन सोनवणे, यांनी सांगितले आहे,या निर्णयामुळे स्थानिक राजकारणात नवीन चढाओढ निर्माण होण्याची शक्यता आहे.

# धोबी- परीट समाजाला पूर्ववत अनुसूचित जाती प्रवर्गाचे आरक्षण द्या.... निवेदनाद्वारे मागणी




परळी वैजनाथ दि.११ (प्रतिनिधी)

धोबी - परीट समाजाला पूर्ववत अनुसूचित जाती प्रवर्गाचे आरक्षण द्या या मागणीचे निवेदन येथील धोबी - परीट समाजाच्या वतीने तहसीलदार व्यंकटेश मुंडे यांना देण्यात आले आहे. धोबी- परीट समाज महाराष्ट्र राज्याच्या निर्मिती पूर्वी म्हणजे १९६० मध्ये बुलढाणा व भंडारा जिल्ह्यांमध्ये केंद्र व राज्य सरकारच्या राजपत्रात अनुसूचित जाती प्रवर्गात समाविष्ट होता. मात्र महाराष्ट्र राज्य स्थापन झाल्यानंतर शासनाने कोणताही ठोस पुरावा न देता या समाजाला इतर मागासवर्गीय (ओबीसी) प्रवर्गात वर्गीकृत केले.यामुळे धोबी- परीट समाजाला पूर्ववत अनुसूचित जाती प्रवर्गात समाविष्ट करण्यात यावे. अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा धोबी - परीटसमाजाच्या वतीने देण्यात आला आहे. यासंदर्भातील मागणीचे निवेदन येथील धोबी - परीट समाजाच्या आरक्षण समन्वय समितीच्या वतीने तहसीलदार व्यंकटेश मुंडे यांना देण्यात आले आहे.

दैनिक लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
सोमवार १३ ऑक्टोबर २०२५
https://lokaarambh.com



# आमदार संग्राम जगतापांचा द्वेष, अजित पवारांचा ढोंगी चेहरा उघडा पडला - जे. डी.शाह

बीड - महाराष्ट्राच्या राजकारणात राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (अजित पवार गट) पुन्हा एकदा वादाच्या भोवऱ्यात सापडला आहे. अहिल्यानगर जिल्ह्यातील आमदार संग्राम जगताप यांनी दिवाळीच्या निमित्ताने हिंदू लोकांना केलेले आवाहन – “दिवाळीची खरेदी फक्त हिंदू दुकानदारांकडून करा, जेणेकरून मुसलमान व्यापाऱ्यांना फायदा होणार नाही” – हे केवळ वादग्रस्तच नाही, तर थेट सांप्रदायिक द्वेष पसरविणारे आहे. आणि या वादावर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिलेली प्रतिक्रिया? फक्त एक ‘शोकाज नोटीस’! हे पुरेसे नाही. हे दोघेही – जगताप आणि पवार – महाराष्ट्राच्या सामाजिक सलोख्याला धक्का देणाऱ्या या घटनेस जबाबदार असुन आमदार संग्राम जगतापांचा द्वेष हा उपमुख्यमंत्री अजित पवारांचा खरा ढोंगी चेहरा उघड पडला आहे. असा आरोप जेष्ठ समाजसेवक जे.डी. शाह यांनी ऐका प्रसिद्धीपत्रकाद्वारे केला आहे.

पत्रात पुढे म्हटले आहे की सर्वप्रथम, संग्राम जगताप यांच्या विधानाकडे पाहू. सोलापूर जिल्ह्यातील एका हिंदू रॅलीत बोलताना त्यांनी स्पष्टपणे म्हटले, “दिवाळीच्या निमित्ताने तुमची खरेदी, तुमचा नफा फक्त हिंदू लोकांपर्यंत पोहोचला पाहिजे. मुसलमानांकडून काहीच खरेदी करू नका.” हे विधान केवळ आर्थिक बहिष्काराची मागणी नाही, तर मुसलमान समुदायाला थेट लक्ष्य करणारा द्वेषाचा विषारी प्रचार आहे. दिवाळी ही सणाची आनंदाची वेळ असते, जिथे सर्व धर्म, सर्व जाती एकत्र येऊन साजरा करतात. पण जगतापांसारखे नेते या सणाला सांप्रदायिक रंग देऊन समाजात फूट पाडण्याचा प्रयत्न करतात. हे विधान केवळ चुकीचे नाही, तर भारतीय घटनेच्या सेक्युलर तत्त्वांचा उल्लंघन करणारे आहे. अशा नेत्यांना आमदार म्हणून विधानसभेत बसण्याचा अधिकारच नाही. त्यांना तुरुंगात टाकणे हेच योग्य आहे, कारण हे विधान थेट धार्मिक द्वेष भडकावण्याचे कटकारस्थान आहे. कारण राष्ट्रवादी पक्षाच्या इतिहासात शाहू महाराज, ज्योतिबा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसारख्या सेक्युलर नेत्यांचा वारसा हा पक्ष चालवितो आहे. असा पारावार उल्लेख अजित पवारांकडून उच्चारला जातो मात्र जगतापांसारखा आमदार हा वारसा मागे टाकून सांप्रदायिक राजकारण करतोय, हे लज्जास्पद असुन फुले , शाहू आंबेडकरांच्या महाराष्ट्राला काळीमा फासणारा ठरत आहे. सध्या अजित पवार यांच्याकडे राज्याची फार मोठी जबाबदारी असुन उपमुख्यमंत्री म्हणून ते राज्य चालवतात आणि राष्ट्रवादीचे नेते आहेत.







पण त्यांची प्रतिक्रिया? “हे विधान पूर्णपणे चुकीचे आहे. आम्ही शोकाज नोटीस देऊ” असं म्हणून भाग पाडण्याचा प्रयत्न. हे काय, फक्त कागदावर नोटीस देऊन जबाबदारी संपली? जगताप यांच्या विधानाचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे, संपूर्ण देश त्यावर बोलतोय, आणि पवार साहेब फक्त नोटीसची धमकी देतात? हे केवळ ढोंगीपणा आहे. जर पक्षाच्या धोरणानुसार अशी विधाने चुकीची आहेत, तर लगेच कारवाई का नाही? आमदाराला पक्षातून बाहेर काढणे, त्याची सदस्यता रद्द करणे किंवा कायद्याच्या कचाट्यात घेणे – हे सगळे पर्याय उपलब्ध आहेत. पण पवार साहेब नोटीशी पुरते मर्यादित राहिले. यामुळे प्रश्न उपस्थित होतो: खरंच ते सेक्युलर आहेत का, की फक्त निवडणुकीसाठी मुसलमान मतदारांना आकर्षित करण्यासाठी हे ड्रामा? त्यांच्या पक्षाने आधीच अनेकदा अशी वादग्रस्त विधाने झाकली आहेत. जगतापांच्या वडिलांच्या निधनानंतर त्यांच्यावर ‘पित्याच्या छत्राखाली नसल्याने जबाबदारी वाढली आहे’ असं पवार म्हणाले, पण हे बोलून भाग कसा? जगताप सतत अशी विधाने करत असल्याचे बातम्यांमध्ये दिसते – जसे की जूनमध्ये मुसलमाना विरोधात केलेली टीका. पवार साहेब, तुम्ही उपमुख्यमंत्री आहात, तरीही तुमच्या आमदारांना सांप्रदायिकतेच्या आगीत भडकण्यास सोडले आहात का? असा आरोप पत्रात करण्यात आला आहे. पुढे म्हटले आहे की महत्त्वाचे म्हणजे, या घटनेमुळे राष्ट्रवादी पक्षाची प्रतिमा धुळीला मिळतेय. पक्षाचे बीड जिल्ह्यातील नेते फारुख पटेल, अशफाक इनामदार ,बरकत पठाण यांनीही पत्र लिहून कारवाईची मागणी केली आहे. ते म्हणतात, “अशी विधाने केल्यास मुसलमान मतदार पक्षापासून दूर जातील.” हे खरे आहे. महाराष्ट्रात शिवसेना-भाजपसारखे पक्ष सध्या सांप्रदायिक राजकारण करत आहेत, आणि राष्ट्रवादीला सेक्युलर म्हणून ओळखले जाते. पण जगतापांसारखे नेते आणि पवारांची दुर्बल कारवाई यामुळे हा वारसा धोक्यात आहे. अजित पवार यांनी लगेच जगतापांच्या कानाखाली वाजवून पक्षातून हद्दपार करायला हवे होते. नोटीस देऊन वेळ मारुन नये. अन्यथा, हा पक्ष खऱ्या अर्थाने ‘राष्ट्रवादी’ राहणार नाही, तर फक्त सत्तेसाठी सांप्रदायिकतेच्या खेळात सामील झालेलाच पक्ष आहे असा ठाम विश्वास जनतेमध्ये रुजत आहे.

पत्रात शेवटी म्हटले की अंतिमदृष्ट्या, ही घटना महाराष्ट्राच्या सामाजिक एकतेचा इशारा आहे. दिवाळी ही सर्वांसाठी आहे – हिंदू, मुसलमान, ख्रिश्चन, सर्व. अशा नेत्यांना रोखणे हे आम्हा सर्वांचे कर्तव्य आहे. अजित पवार आणि संग्राम जगताप, तुमची ही कृत्ये महाराष्ट्राच्या सेक्युलर वारशाला कलंक आहेत. लगेच कारवाई करा, अन्यथा इतिहास तुम्हाला माफ करणार नाही! असा इशारा जेष्ठ समाजसेवक जे.डी. शाह यांनी केला आहे.



## माजलगाव तालुक्यातील पुरग्रस्थांना श्री स्वामी समर्थ सेवा मार्गाचा मदतीचा हात

माजलगाव- नवरात्रौत्सवात बीड जिल्ह्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे गोदावरी व सिंधफणा नदीच्या काठावर असलेल्या गावांना पुराचा तडाखा मोठ्या प्रमाणात बसला अनेक कुटुंबांची आर्थिक स्वरूपात नुकसान झाले. अशावेळी अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ गुरुपीठ त्र्यंबकेश्वर येथील पिठाधीश परमपूज्य गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे यांच्या आशीर्वादाने व मार्गदर्शनाने गुरुपुत्र नितीन भाऊ मोरे यांच्या उपस्थितीत माजलगाव तालुक्यातील पुरुषोत्तमपुरी, मंजरथ , देपेगाव , सांडस चिंचोली, आळसेवाडी, गंगामसला येथील पुरग्रस्थांना किराणा किट्ट, साड्या, ब्लॅंकेट इतर जीवनावश्यक वस्तू देऊन मदत करण्यात आली या स्तुत्य व समाजोपयोगी उपक्रमांमध्ये इंडियन मेडिकल असोसिएशन, रोटरी क्लब ऑफ माजलगाव सेंट्रल तसेच बीड जिल्हा मराठी पत्रकार संघानेही आपले योगदान दिले. यावेळी मंडळ अधिकारी सोपान सोनवणे, इंडियन मेडिकल असोसिएशनचे डॉ शामसुंदर काकाणी, डॉ शिवाजीराव काकडे, डॉ यशवंत राजेभोसले, डॉ अशोक घुबडे, डॉ अभिजित सोळंके, रोटरी क्लब ऑफ माजलगाव सेंट्रल चे पांडुरंग चांडक, मराठी पत्रकार संघाचे हरिष यादव, पांडुरंग उगले, सावंत तसेच सर्व पत्रकार बांधव, माजलगाव तालुक्यातील श्री स्वामी समर्थ सेवा केंद्रातील सेवेकरी उपस्थित होते.

## एकनाथ शिंदे, डॉ श्रीकांत शिंदेंचा पूरग्रस्तांसाठी महत्वाचा उपक्रम; शिवसेना डॉक्टर सेलच्या शिबिरातून शेकडो बीड ग्रामस्थांना मदत!

### मानवतेची सेवा हाच एकनाथ शिंदे साहेबांचा धर्म जगताप, मुळूक, गलधर


### बीड जिल्ह्यात पूरग्रस्त भागात शिवसेना डॉक्टर सेलच्या मोफत आरोग्य व पशुवैद्यकीय शिबिराचे यशस्वी आयोजन

बीड, प्रतिनिधी – हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे व धर्मवीर आनंदजी दिघे साहेब यांच्या प्रेरणेने तसेच महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री व शिवसेना मुख्य नेते एकनाथजी शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि संसदरत्न खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या नेतृत्वाखाली बीड जिल्ह्यातील पूरग्रस्त भागात मोफत वैद्यकीय आणि पशुवैद्यकीय मदत शिबिरांचे आयोजन करण्यात आले होते. गेवराई तालुक्यातील गोगलगाव, गंगावाडी, बोरगाव, पांढरी, मिरगाव, माळस, पिपळगाव, सावळेश्वर, नागझरी आणि खामगाव या गावांमध्ये आलेल्या पुरामुळे ग्रामस्थांना मोठ्या प्रमाणात अडचणींना सामोरे जावे लागले. या वाईट परिस्थितीत, दि. 12 ऑक्टोबर 2025 रोजी सकाळी 7.00 वाजल्यापासून रात्री 8.00 वाजेपर्यंत शिवसेना डॉक्टर सेलच्या टीमने गावोगावी जाऊन नागरिकांची आरोग्य तपासणी केली, औषधे वाटप केली आणि तातडीची मदत पोहोचवली. या सेवाकार्यात डॉ. धनंजय पडवळ (प्रदेशाध्यक्ष, शिवसेना डॉक्टर सेल), डॉ. करणसिंह गाडे (प्रदेशाध्यक्ष, आयुष होमिओपॅथिक विंग), डॉ. अमोल आंबेकर (महाराष्ट्र प्रदेश संघटक), डॉ. उमेश




जाधव (मराठवाडा विभाग प्रमुख), डॉ. अनुराधा पेडणेकर, डॉ. किरण वनवे, डॉ. मंगेश बाजड पाटील, डॉ. विश्वंभर देशमुख, डॉ. काकासाहेब गंडाळ, डॉ. गौतम सोनावणे, डॉ. सचिन पाचखांडे, डॉ. राखी कपूर, डॉ. प्रतिभा काळे, डॉ. समिक्षा सेठ, डॉ. मेघा जोशी, डॉ. संदीप सालपे, डॉ. ब्रम्हदेव खिलारे, डॉ. सत्यम चौधरे, डॉ. गणेश शिंदे, डॉ. प्रवीण पवार, डॉ. ज्ञानेश्वर ढास यांच्यासह अनेक डॉक्टरांनी सहभाग घेतला होता. त्यांच्या कार्याची बीड जिल्हा शिवसेनेच्या वतीने विशेष दखल घेऊन त्यांचा शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, जिल्हाप्रमुख स्वप्नील गलधर यांनी सत्कार करून आभार व्यक्त केले. तसेच महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री तथा शिवसेना मुख्य नेते सन्माननीय एकनाथजी शिंदे साहेब आणि संसदरत्न खासदार डॉ श्रीकांत शिंदे यांचा मानवतेची सेवा हाच धर्म असल्यामुळे तळागाळातील लोकांना त्यांनी रावबलेल्या अभिनव उपक्रमांचा फायदा होतो आहे, अशी भावना शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, जिल्हाप्रमुख स्वप्नील गलधर यांनी आपल्या भाषणातून व्यक्त केली. अँड नारायण शिंदे उप जिल्हाप्रमुख, उद्धव मडके तालुका प्रमुख, नवनाथजी गवते विधानसभा प्रमुख, मुकेश अण्णा महाजन शहर प्रमुख, बबन मोघे युवा सेना तालुका प्रमुख, बाळासाहेब खेडकर ओबीसी तालुकाप्रमुख, संतोष तपसे, डाके मामा, भागवतराव डाके, ऋषिकेश उधे, विजय पवार, नागराज तलवाडे, अंकुश गिरी, शेख जावेद, अशोक कदम इतर सर्व गावकरी आणि गेवराई तालुक्यातील शिवसैनिक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

\- - - - -





## राजकारणात राहून समाज हित जोपासणारे विनयशील व्यक्तिमत्व विनायक मामा रत्नपारखी.

राजकारण म्हणजे घाण, राजकारण म्हणजे गटारगंगा, राजकारण म्हणजे भ्रष्टाचार, राजकारण म्हणजे स्वार्थ लबाडी हपापलेपणा अशा या राजकारणात कोणताही सज्जन व्यक्ती चुकून येणार नाही आणि आला तरी यशस्वी होणार नाही असाच सर्वमान्य भाव. मात्र हा भाव पुसून काढला विनायक रत्नपारखी या सर्व सामान्य घरातून आलेल्या सर्वसामान्य व्यक्तीने...

भारतीय जनता पक्षाचा साधा सदस्य, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा निस्सीम कार्यकर्ता अशी ओळख असलेल्या विनायक नरहरी रत्नपारखी यांनी नगरसेवक गटनेता पाणीपुरवठा सभापती ते माजलगाव शहर तालुकाध्यक्ष ही जी पदांची किमया लीलया पार पाडलेले आहे ती केवळ सदगुण सुविचार सद प्रवृत्ती या गुणांवर आजच्या राजकारणात इतकं चारित्र्यसंपन्न शुद्ध कोणी असू शकते का ? असं जर प्रश्न विचारला तर त्याचे उत्तर नाहीच असे येते परंतु हे उत्तर होय असे आहे. राजकारणापेक्षा समाजकारणाला महत्त्व देणारे माजी नगरसेवक विनायक मामा रत्नपारखी* समाज कोणताही असो, धर्म कोणताही असो प्रत्येकाच्या अडी अडचणीला आणि समस्येला धावून जाणारा ऊमदा आणि तरुण कार्यकर्ता म्हणजे माजलगावचे माजी नगरसेवक विनायक मामा रत्नपारखी. त्यांच्या सामाजिक कार्याचे उदाहरण तशी भरपूर आहेत. आणि या त्यांच्या सामाजिक कार्याचे कौतुक करावे तेवढे थोडेच आहे. कोणताही स्वार्थ न बाळगता समाज बांधवांना मदत करणे कोणताही जातीभेद , धर्मभेद मनात न बाळगता जो अडचणीत आहे जो समस्येत आहे, त्याला मनातून मदत करणे आणि ही मदत करत असताना त्याची प्रसिद्धी व्हावी असा कोणताही हेतू मनात न ठेवता ते आपले कार्य करत असतात. माजलगाव नगर परिषदेमध्ये त्यांच्या वार्डामध्ये ते लोकप्रिय तर आहेतच , पण माजलगाव शहरात त्याचप्रमाणे मराठवाडा विभागात आणि आता राज्यात देखील त्यांच्या या कार्याची दखल घ्यावी असे त्यांचे हे कार्य आहे. धारूर येथील सतीश बाबुराव वारे यांना अचानक हृदयविकाराचा झटका आला त्यांच्याजवळ त्यांच्या घरचे कोणी नव्हते, कोणाला याची माहिती नव्हती माजलगावच्या माऊली हॉस्पिटलमध्ये त्यांना ऍडमिट करण्यात आले होते. त्यांच्या जवळ पैसे नव्हते त्यांचे ऑपरेशन करायचे तर जवळ पैसे नाहीत, याची माहिती विनायक मामा रत्नपारखी यांना मिळाली आणि क्षणाचाही विलंब न लावता मामा तिथे पोहोचले. तीन दिवस त्या रुग्णाची सेवा केली एन्जोग्राफी केल्यानंतर एन्जोप्लास्टी करणे गरजेचे होते. त्यावेळेस घरचे सोबत कोणी नसताना विनय मामा यांनी डाके हॉस्पिटल येथील डॉक्टरांना बोलावून स्वतः त्या ठिकाणी थांबून एन्जोप्लास्टी करून घेतली व त्या ठिकाणी आर्थिक सहकार्य देखील केले. व शासनाच्या योजनांमधून त्यांना सहकार्य कसे मिळेल ? यासाठी त्यांनी प्रयत्न केले. त्यांना दवाखान्यातून डिस्चार्ज मिळेपर्यंत त्यांना सर्व सहकार्य त्यांनी केले. त्यांच्या स्वतःच्या घरीहून त्यांनी त्यांना तीन दिवस जेवणाचा डबा पुरवला. त्या ठिकाणी पूर्ण वेळ थांबून त्या रुग्णाला सर्वतोपरी सहकार्य केले.

त्याचप्रमाणे गेल्या आठवड्यात पंडित तात्या देव जोशी यांचे एक लाख रुपये चोरट्याने चोरून नेले असता ते त्या ठिकाणी घाबरलेले होते. त्यावेळेस विनायक मामा रत्नपारखी यांनी त्यांच्याशी फोनवर संपर्क साधला स्वतः त्यांनी या प्रकरणात लक्ष घातले माजलगाव पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक यांना बोलून सर्व घटना सांगितली. आणि या प्रकरणांमध्ये संबंधिताला त्यांनी खूप असे सहकार्य केले. महत्त्वाचे सांगायचे म्हणजे कोणत्या वेळेला कधीही कोणाचा फोन आला तर ते कोणालाही नाही म्हणत नाहीत. केलेल्या कामाची कोठे जास्त प्रसिद्धी न करता आपण आपले काम करणे याला ते प्राधान्य देतात. त्यांच्या बरोबर त्याने आपल्या समाजातील अनेक लोकांना संघटित करून या कामात एकमेकांना मदत करण्यासाठी प्रोत्साहित केले आहे. आताची ताजी घटना म्हणजे चिंचगव्हाण परिसरामध्ये राहणाऱ्या पार्वतीबाई शंकरराव मुळे यांचे वयाच्या 88 व्या वर्षी वृद्धाप काळाने दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात त्यांचा भाऊ भगवान देशमुख व एक मुलगी असा परिवार आहे. स्वर्गीय पार्वती बाई मुळे यांचा छोटा परिवार असल्यामुळे व जास्त अप्तेष्ट कोणी नसल्यामुळे त्यांचा अंत्यविधी कसा करायचा? असा प्रश्न शेजारी पाजारी या लोकांना पडला होता . समाजसेवक विनायक मामा रत्नपारखी यांना कळाल्यानंतर त्यांनी ब्राह्मण समाजातील काही समाज बांधवांना एकत्रित केले. आणि सर्वांनी त्यांच्या अंतिम संस्काराची तयारी केली व आजीला खांदा दिला . माजलगावच्या मंगलनाथ वैकुंठ धाम स्मशानभूमी मध्ये सर्वांच्या वतीने नगरसेवक विनायक मामा रत्नपारखी यांनी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली. पार्वती बाई मुळे यांच्या निधनाची वार्ता कळल्यानंतर त्यांनी ताबडतोब चिंचगव्हाण येथे जाऊन त्यांच्या घरी भेट दिली. त्या आजीच्या मुलीला धीर दिला आणि इतर समाज बांधवांना फोन करून व सोशल मीडियाच्या माध्यमातून सर्वांशी संपर्क साधून ही दुःखद वार्ता सांगितली. आपल्या समाजातील एका व्यक्तीवर अशी वेळ आल्यानंतर ते तातडीने धावून जातात. आणि या त्यांच्या कामामध्ये ते इतरांचे सहकार्य देखील घेतात . या दुःखद प्रसंगी त्यांच्यासोबत बाळकृष्ण कुलकर्णी, दत्ता काळे, प्रशांत खडके, संतोष काटकर बाळासाहेब कुलकर्णी , दामोदर संधीकर, राहुल कुलकर्णी, भोले, मकरंद कुलकर्णी, निरंजन वाघमारे या सर्व समाज बांधवांनी उपस्थित राहून सामाजिक बांधिलकी व माणुसकीची भिंत जपत माणुसकी हिच जात आहे व माणुसकी हाच धर्म आहे असे समजून त्यांनी हे कर्तव्य पार पाडले.

पार्वती बाई मुळे या आजीचे सर्वांनी मिळून मंगलनाथ वैकुंठ धाम येथे अंत्यसंस्कार केले. हे सर्व कार्य करत असताना ते तो आपल्या समाजाचा आहे , जातीचा आहे किंवा धर्माचा आहे असा कोणताही विचार न करता सर्व जाती-धर्माच्या लोकांसाठी ते अहोरात्र झटत असतात रस्त्यावर काम करणारा एक कार्यकर्ता म्हणून त्यांची ओळख आहे. त्यांचा स्वतःचा वाढदिवस असला तर स्वतःसाठी कपडे खरेदी न करता घरात गोड गोड न करता किंवा इतर कोणताही खर्च न करता ते कपडे खरेदी करून गोरगरिबांना देतात गोड पदार्थ किंवा फराळाचे पदार्थ घरी तयार करून किंवा बाहेरून विकत घेऊन ते गोरगरिबांना वाटतात गोरगरिबांच्या चेहऱ्यावर यामुळे जो आनंद मिळतो तोच माझा आशीर्वाद आहे . आणि मला भविष्यात जास्तीत जास्त चांगले काम करण्याची प्रेरणा देणारा आहे असे ते बोलून दाखवतात. त्यांचे हे समाजकार्य ब्राह्मण समाजातील किंवा इतर कोणत्याही समाजातील जे शिकले सवरलेली मुलं आहेत जे आपल्या आई बापांना विचारत नाहीत, आई बापाला वृद्धाश्रमाचा रस्ता दाखवतात. किंवा आईबाप कुठेतरी खेड्यात असतात त्यांची काळजी घेत नाहीत त्यांच्या दवाखान्याच्या खर्चाची किंवा औषध पाण्याची काहीही व्यवस्था करत नाहीत. त्यांच्या आई वडीलांना त्रास देतात, ज्या आई-वडिलांची काळजी घ्यायला हवी त्या आई-वडिलांची काळजी ते घेत नाहीत. आई-वडिलांची काळजी घेणे हे त्यांचे कर्तव्य आहे हे त्यांना समजत नाही. अशा सर्व मुलांसाठी विनायक मामाचे हे समाजकार्य म्हणजे एक सणसणीत चपराक आहे.

स्वतःच्या आई-वडिलांची काळजी घेतली पाहिजे आपल्या परिवाराची काळजी घेतली पाहिजे. माणुसकी जपली पाहिजे. आपल्यातील माणुसकी जिवंत ठेवून नातेसंबंध जोपासले पाहिजेत . हे सर्व कार्य करत असताना कोणताही नातेवाईक आपल्यामुळे दुःखी झाला नाही पाहिजे. आपल्या कुटुंबाला जेवढा वेळ देता येईल, तेवढा वेळ ते नक्कीच देतात. पण त्याचबरोबर ते इतरांची काळजी घेतात ते समाजासाठी वेळ देतात. समाजातल्या अनेकांच्या सुख दुःखात ते सहभागी होण्याचा प्रयत्न करतात. जो समाजात आडीअडचणीत आहे दुःखी आहे त्याला जी शक्य होईल ती मदत करण्याचा ते नक्की प्रयत्न करतात. त्यामुळे त्यांचे हे कार्य खरोखरच प्रशंसानीय आहे माणुसकी काय असावी ? माणुसकी धर्म काय असावा? याचे एक उत्तम उदाहरण म्हणजे माजलगाव चे विनायक मामा रत्नपारखी...... वाढदिवसानिमित्त जे आर्थिक दृष्ट्या कमकुवत आहेत अशा विद्यार्थ्यांना शालेय शिक्षणासाठी मदत करणे, त्यांना गणवेश वाटप करणे यासारखे उपक्रम देखील ते नेहमी राबवतात त्यांचा वाढदिवस म्हणजे माजलगावकरांसाठी एक संस्मरणीय दिवस असतो. अशा या कार्यासाठी नेहमीच अनेक लोकांच्या शुभेच्छा आणि सहकार्य त्यांना असते आणि ते आपल्या कामात कधीही मागे वळून पाहत नाहीत. त्यांना हे काम करत असताना एक वेगळाच आनंद मिळत असतो आणि हा आनंद तो गोरगरिबा सोबत जे आर्थिकदृष्ट्या कमकुवत आहेत अशा लोकांसोबत साजरा करतात. या त्यांच्या सामाजिक कार्यामध्ये माजलगाव शहरातील सामाजिक कार्याची आवड असणारे त्यांच्या जवळचे सर्व स्नेही बांधव हे नेहमी त्यांना सहकार्य करत असतात हे या ठिकाणी वेगळे सांगायला नको. अशा या विनायक मामा रत्नपारखी यांचे हे समाजकार्य म्हणजे इतरांसाठी एक आदर्श असे उदाहरण आहे. त्यांच्या या कार्याची दखल विविध सामाजिक संस्था किंवा शासनाने नक्कीच घ्यायला हवी . कारण ते समाजकार्य मनातून करतात. समाज कार्य करण्याचे ढोंग ते कधीच करत नाहीत समाजासाठी झटणे, समाजाची सेवा करणे, आणि समाजाच्या उन्नतीसाठी प्रयत्न करणे हे त्यांचे ध्येय आहे. अशा ध्येयवेड्या माणसाच्या कार्याची समाजाने देखील दखल घेणे गरजेचे आहे तुर्त एवढेच....!

**निरंजन वाघमारे छायाकार : रमाकांत मुंडे,**

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
सोमवार १३ ऑक्टोबर २०२५
https://lokaarambh.com



# पी आय.साहेब सावतामाळी मंदीर परिसराला अवैध धंद्याच्या विळख्यातुन मुक्त करा - राजकुमार डाके

परळी ( प्रतीनीधी ) शहरातील सावतामाळी मंदीर परिसरात वाढती गुन्हेगारी थांबवण्यासाठी सावता माळी मंदिर परिसरात सुरु असलेले सर्व अवैध धंदे तात्काळ बंद करून या परिसरातील नागरीकांना भयमुक्त करावे अशी मागणी राजकुमार डाके यांच्यासह असंख्य सामाजीक कार्यकर्त्यांच्या वतीने संभाजी नगर पोलीस स्टेशनचे पोलीस नीरीक्षण धनंजय ढोणे यांच्या कडे निवेदणामार्फत करण्यात आली आहे.

गेल्या अनेक वर्षापासुन सावता माळी मंदीर परिसरातील कीर्ती नगर, कृष्णा नगर, गंगासागर नगर, सिध्देश्वर नगर या परिसरात अवैध धंद्याचा विळखा पडलेला आहे या अवैध धंद्यामुळे भावी पीढी व्यसनाच्या आहारी जाऊन अवैध मार्गाला लागुन यातुन अनेक गंभीर गुन्हेगारी प्रवृत्तीकडे वळत आहे. या गुन्हेगारी अपप्रवृत्तीला ना जात पात नसुन हि अपप्रवृत्ती आहे ती आलीकडच्या काळात या परिसरात प्रचंड प्रमाणात वाढलेली दीसत आहे. लहान वयातच अनेक मुले वाईट व्यसनाच्या आहारी जात आहेत यातुन भांडणे, तंटे, वादविवाद, माता भगीणींची छेडछाड आदी प्रकार घडत आहेत. यातुन अनेकांचे संसार ऊद्धवस्त झाले असुन अनेक जणांनी आपले आयुष्य संपवल्याचे हि प्रकार घडले आहेत. लहान लहान मुले गुन्हेगारीकडे वळताना दिसत आहेत यातुन भावीपीढी ऊद्धवस्त होत आहे. हे सर्व प्रकार थांबवण्या साठी तात्काळ या परिसरातील सर्व अवैद्य धंदे तात्काळ कायमचे बंद करण्याची लेखी मागणी राजकुमार डाके यांच्या वतीने संभाजी नगर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक धनंजय ढोणे यांच्याकडे करण्यात आली. या निवेदणावर सामाजीक कार्यकर्ते आनंत ईंगळे, योगेश पांडकर, बालासाहेब गायकवाड, भारत ताटे, दत्ता दहिवाळ, महेश बागवाले, सुरेश नानवटे, रामेश्वर फडकरी, अतूल माळी,काशिनाथ शंकुरवार, रविभाऊ मुळे, ञुशिकेश वानरे, वैजनाथ भोकरे, गणेश महाराज, आशोक महाराज, माधव वानरे, शिवाजी फड, नागनाथ मुंडे, जालींदर फड आदींच्या वतीने देण्यात आले.

# ह.भ.प. जनाई महाराज कोकाटे संगमकर कन्हैया वारकरी शिक्षण संस्था यांच्या कीर्तनाचे कनेरवाडी येथे आयोजन

परळी वैजनाथ

परळी तालुक्यातील मौजे कन्हेरवाडी येथे श्री विठ्ठल रुक्मिणी मूर्ती स्थापनेच्या ५ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित भव्य दिव्य शिवमहापुराण कथा व कीर्तन सोहळा मोठ्या भक्तीभावात सुरू आहे. या धार्मिक सोहळ्यात दिनांक १३ ऑक्टोबर २०२५ रोजी परळीची कन्या व लोकप्रिय कीर्तनकार शिव महापुराण कथा प्रवक्त्या ह.भ.प. जनाई महाराज कोकाटे संगमकर यांच्या



कीर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे. ह.भ.प. जनाई महाराज यांच्या कीर्तनातून भगवान शंकर महिमा, संतवाङ्मयातील शिकवण, भक्तीमार्गाचे महत्त्व आणि जीवनमूल्यांचा संदेश भाविकांना दिला जाणार आहे. त्यांच्या रसाळ आणि प्रेरणादायी कीर्तनातून भाविकांना आध्यात्मिक ऊर्जेचा अनोखा अनुभव लाभणार आहे. या कीर्तनासाठी कन्हेरवाडी परिसरातील भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण असून मोठ्या संख्येने श्रोते उपस्थित राहणार आहेत. या संपूर्ण सोहळ्याचे प्रमुख शिवमहापुराण कथा प्रवक्त्ये श्री ह.भ.प. गोविंद महाराज मुंडे (कन्हेरवाडीकर) असून समारोप प्रसंगी श्री. ह.भ.प. गणेशनंद महाराज शास्त्री भागवतकार यांचे प्रवचन होणार आहे. या कार्यक्रमाचे आयोजन श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समिती, कन्हेरवाडी व समस्त गावकरी मंडळ महिला मंडळ कन्हेरवाडी यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचा कनेरवाडी परिसर व

# बीडच्या सिंदफना नदीपट्टूयातील पूं बाधितांना पुण्याच्या पिंपरी चिंचवड माउंटेरिंग क्लबचा मदतीचा हात..

बीड - दि १२ अतिवृष्टी आणि पूर परिस्थितीमुळे बीड जिल्ह्यातील सिंदफणा नदीपट्ट्यातील शिरसमार्ग व हिंगणी हवेली गावातील पूरग्रस्तांना पिंपरी चिंचवड माउंटेरिंग क्लब च्या वतीने मदतीचा हात देण्यात आला आहे.. शिरसमार्ग गावातील 40 कुटुंबाला दिवाळीसाठी लागणारा संपूर्ण किराणा भेट देण्यात आला आहे. आज क्लबच्या सदस्यांच्या हस्ते या मदत किटचे वाटप करण्यात आले.. यावेळी प्रमुख उपस्थिती.. क्लबचे सदस्य माजी प्राचार्य हरिदास जोगदंड ,अविनाश पिंगळे खजिनदार ,शिवाजी शिंदे, सतीश बुर्डे ,अरुण बोरकर, संतोष उत्कर, जगन माळी, अभय जोगदंड,सुदर्शन शिंदे, पत्रकार सुरेश महाराज जाधव यांच्यासह गावातील शेकडो लोक उपस्थित होते.. बीडच्या गेवराई तालुक्यातील शिरसमार्ग गावाला सिंदफना नदीच्या महापुरामुळे मोठा तडाखा बसला आहे .शेकडो एकर शेती, माती आणि पिके





उध्वस्त झाली आहेत. या शेतकऱ्याची व्यथा वृत्तवाहिनीच्या माध्यमातून पाहिल्यानंतर पुणे येथील पिंपरी चिंचवड माउंटेरिंग क्लबच्या सदस्यांनी मदत गोळा केली.. त्या मदतीचे आज शिरसमार्ग गावात वाटप करण्यात आले. मारुतीच्या मंदिरात भाव वाटप कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी बोलताना क्लबचे सदस्यांनी तुमच्या दुःखामध्ये आम्ही सोबत आहोत, तुमचे दुःख पाहिल्यानंतर दिवाळी गोड व्हावी याकरता आम्ही हे फुल नाही फुलाची पाकळी म्हणून मदत करत आहोत ती गोड मानून घ्यावी. असे मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक आणि सूत्रसंचालन सुरेश जाधव यांनी केले. यावेळी शेतकऱ्यांना दिवाळीचा सण साजरा करता यावा यासाठी लागणारे किराणा डाळ तेल साखर तांदूळ यासह अन्य किराणातील साहित्य किट तब्बल वीस किलोची किट वाटप करण्यात आली .. यावेळी गावकऱ्यांनी क्लबचे आभार मानले..

# खरेदीला प्राधान्य द्या, व कुठल्याही जातीयवादाला थारा देऊ नका !

माजलगाव प्रतिनिधी तालुक्यातील सर्व नागरिकांना कळविण्यात येते की, काही अपप्रवरत्ती सणाच्या खरेदीसाठी हिंदू मुस्लिम असा जातीयवाद करत आहेत परंतु आम्ही आपणास आवाहन करतो की आपण असा कुठलाही जातीयवाद न करता आपण आपल्या पसंतीच्या दुकानात मनसोक्त खरेदी करावी कारण आपला तालुका हा सर्वधर्म समभाव जोपासणारा आहे त्यामुळे कृपया आपण जातीयवाद न करता आपल्या पसंतीच्या दुकानात खरेदी करावी आपण ऑनलाइन खरेदी न करता लोकलच्या दुकानातून खरेदी करावी कारण हे दुकानदार आपल्या सुखदुःखात व कुठल्याही कार्यक्रमाच्या वर्गणीसाठी आपल्या कामी येतात म्हणून आम्ही आपणास विनंती करतो की ऑनलाईन खरेदी टाळा व लोकल खरेदीला प्राधान्य द्या, व कुठल्याही जातीयवादाला थारा देऊ नका ही नम्र विनंती

तालुका व्यापारी महासंघ माजलगाव मा.सुरेंद्र रेदासनी

# माऊंट लिटरा झी स्कूलच्या विद्यार्थ्यांनी जिल्हास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेत मिळिवले घवघवीत यश

परळी/ प्रतिनिधी क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य,जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय बीड व गटशिक्षणाधिकारी कार्यालय परळी यांच्या संयुक्त विद्यमानाने बीड क्रीडा संकुलन येथे आयोजित क्रीडा स्पर्धेमध्ये माऊंट लिटरा झी स्कूलच्या विद्यार्थ्यांनी जिल्हास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेत विजय संपादन केल्याबद्दल माऊंट लिटरा झी स्कूलचे अध्यक्ष





डॉ हरिश्चंद्र वंगे दादा,उपाध्यक्ष प्राध्यापक कैलास घुगे सर, प्राचार्य मंगेश काशीद सर क्रीडाशिक्षक मारुती कांबळे, वैष्णवी जिरगे यांच्या हस्ते या विजयी विद्यार्थिनी आराध्या सौंदळे हिचा सत्कार करण्यात आला. परळीतील खेळाडूंना विविध प्रकारच्या खेळांची आवड निर्माण करून मैदानी खेळातील खेळाडूंना प्रेरणा देण्यासाठी माऊंट लिटरा झी स्कूलचे अध्यक्ष सुप्रसिद्ध डॉक्टर हरिश्चंद्र वंगे दादा यांनी शाळेच्या माध्यमातून वेळोवेळी या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून मैदानी खेळातील महत्व आणि बौद्धिक विकास खेळातील महत्व कसे प्राप्त केले जाते याविषयी मार्गदर्शन केले.या कार्यक्रमाच्या प्रसंगी शाळेचे उपाध्यक्ष प्राध्यापक कैलास घुगे सर, प्राचार्य मंगेश काशीद सर उपस्थित होते या कार्यक्रमास शाळेतील सर्व शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते



महाराष्ट्र राज्याच्या ऊर्जा विभागाचे सहसचिव नारायणराव कराड यांनी इंटक नेते दत्तात्रय गुट्टे यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट दिली . यावेळी परळी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी शिवाजीराव मुंडे , माणिकराव नागरगोजे , निवृत गटशिक्षण आधिकारी बालासाहेब गित्ते , रामा ग्रुपचे सर्वेसर्वा सतीशभाऊ केंद्रे , सामाजिक कार्यकर्ते महादेवराव फड ,सहाय्यक प्रयोगशाळा रसायन शास्त्रज्ञ वसंतराव फड व इतर उपस्थित होते.

# नगरपंचायतीकडून ऊसतोड कामगारांना ओळखपत्र वाटप.(फोटो)

## वडवणी शहरातील ऊसतोड कामगारांनी ओळखपत्र घ्यावे.:- शेषेराव

वडवणी/प्रतिनिधी वडवणी नगरपंचायतीच्या वतीने ऊसतोड कामगारांना ओळखपत्र वाटप करण्यात आले. ऊसतोड कामगारांचे हक्क अबाधित राहावेत व शासनाच्या विविध योजना त्यांच्यापर्यंत पोहोचाव्यात सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या शासन निर्णयानुसार वडवणी नगरपंचायतच्या वतीने पहिले ऊसतोड कामगार ओळखपत्र आज ऊसतोड मजूर श्री. हनुमंत आण्णासाहेब कदम यांना अदा करण्यात आले.तरी वडवणी शहरातील सर्व ऊसतोड



कामगार बांधवांनी नगरपंचायत कार्यालयात नोंदणी करून आपले ओळखपत्र प्राप्त करून घ्यावे असे आवाहन नगराध्यक्ष शेषराव बापु जगताप व उपनगराध्यक्ष बन्सी भाऊ मुंडे यांनी केले आहे. ही उपक्रमाची सुरुवात म्हणजे ऊसतोड कामगारांच्या जीवनात सन्मान व हक्कांचा नवा अध्याय सुरू करण्याचे पाऊल आहे. ऊसतोड कामगारांना ओळखपत्र मिळाल्याने त्यांना शासकीय योजनांचा लाभ घेणे सुलभ होणार असून त्यांच्या ओळखीला अधिकृत मान्यता मिळाली आहे.या उपक्रमाबद्दल ऊसतोड कामगारांनी नगरपंचायतीचे आभार मानले.यावेळी नगराध्यक्ष शेषेराव जगताप,उपनगराध्यक्ष बन्सी भाऊ मुंडे, कार्यालयीन अधीक्षक करांडे मॅडम, श्री. संतोष मुंडे तसेच नगरपंचायतचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# गुरुकुलमध्ये घुसून 11 विद्यार्थ्यांना मारहाण

## चालकाच्या पित्यावरही केला हल्ला, दोघाजणांविरोधात गुन्हा दाखल

परळी, (प्रतिनिधी )÷ शाळेमधून गुरूकुलकडे येणाऱ्या विद्यार्थ्यांना रस्त्यामध्ये अडवत परिक्षेत पेपर का बघू दिला नाही असे म्हणून दोघा जणांनी 11 विद्यार्थ्यांना बेल्ट, बुटाने जबर मारहाण करत जखमी केले. ही घटना शहरातील सिध्देश्वर नगर भागातील नर्मदेश्वर गुरूकुलात काल दुपारी घडली. विद्यार्थ्यांना उपजिल्हा रूग्णालयात दाखल करण्यात आले. विद्यार्थ्यांना मारहाण केल्यानंतर पुन्हा गुरूकुल चालकाच्या पित्यालाही मारहाण करण्यात आली आहे. या प्रकरणी दोघा जणांविरोधात परळी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. परळीच्या सिध्देश्वर नगर मध्ये अर्जुन महाराज शिंदे यांचे तीन वर्षापासून श्री नर्मदेश्वर गुरूकुल आहे. या गुरूकुलात 42 विद्यार्थी भजन, किर्तन,



मृदंगाचे शिक्षण घेवून कृष्णा नगर व गणेश पार रोडवरील शाळेमध्येही ते शिक्षण घेत आहेत. शुक्रवारी या विद्यार्थ्यांची शाळेत परिक्षा होती. परिक्षा देवून विद्यार्थी गुरूकुलाकडे जात असतांना त्यांना दिनेश माने व बाळू एकीळवाले या दोघाजणांनी अडवून तुम्ही परिक्षेत पेपर का पाहू दिला नाही असे म्हणतं मारहाण केली.

# आई-बाबा मला जिवदान मिळेल का चिमुकल्या श्रेयाची अर्त किंकाळी

# चिमुकल्या श्रेयाच्या वैद्यकीय उपचारासाठी आर्थिक मदतीची गरज.

# समाजातील दानशूरानी मदतीसाठी पुढे येण्याचे आवाहन.

वडवणी प्रतिनिधी :-

वडवणी तालुक्यातील कुप्पा येथील पत्रकार शंकर जाधव यांची नऊ वर्षीय मुलगी श्रेया हिला जन्माच्या तीन महिन्यापासून थॅलेसिमिया आजार असुन तिच्या बेंगलोर येथील हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी डॉक्टरांनी तब्बल 15 लाख रुपये खर्च येणार असल्याचे सांगितले आहे तरी चिमुकल्या श्रेयाला जीवदान देण्यासाठी समाजातील दानशूर व्यक्ती संस्था लोकप्रतिनिधी यांनी पुढे येऊन आर्थिक मदतीचा हात देण्याची आवश्यकता आहे.

सविस्तर वृत्त असे की, वडवणी तालुक्यातील कुप्पा येथील रहिवासी असलेले पत्रकार शंकर जाधव ते पत्नी, मुलगा, मुलगी आई-वडिलांसह राहतात त्यांना एकच मुलगी कु श्रेया आहे.अत्यंत गरीब परिस्थितीमध्ये मोलमजुरी करून आपला कुटुंब उदरनिर्वाह भागवतात. त्यांची आर्थिक परिस्थिती ही हालाकीची असून त्यांना शेती किंवा इतर काही व्यवसाय नाही पत्रकार शंकर जाधव यांची मुलगी कु.श्रेया हिला “थॅलेसिमिया” हा दुर्धर आजार जडला आहे. तिच्या शरीरात नैसर्गिक रक्त तयार होत नसल्यामुळे वय वर्ष ०३ महिन्याची असल्यापासून आज ९ वर्षाची असून तिला पंधरा दिवसाला रक्त द्यावे लागत आहे. तिच्या कुटुंबीयांनी आजपर्यंत तिला परिस्थिती नसताना मजुरी व काबाडकष्ट करून दहा ते बारा लाख रुपये खर्च केलेला आहे. तिला सध्या बेंगलोर येथे उपचार सुरू आहेत. यासाठी हॉस्पिटल साठी 15 लाख व इतर दहा लाख असा एकूण 25 लाख लाख रुपये खर्च येणार असून तिच्या उपचारासाठी कुटुंबीयांना एक वर्ष बेंगलोर येथे राहावे लागणार आहे तसेच तिचा वैद्यकीय उपचार हा अत्यंत कठीण असून यामध्ये तिच्या जिवीताला देखील धोका डॉक्टरांनी सांगितलेला आहे. तरी श्रेया हिला जीवदान मिळावे यासाठी वैद्यकीय उपचारासाठी मोठा खर्च येणार आहे तरी त्यासाठी समाजातील दानशूर व्यक्ती, सामाजिक संस्था लोकप्रतिनिधी यांनी पुढे येऊन फुल नाही फुलाची पाकळी पत्रकारांच्या मुलीचा जीव वाचवण्यासाठी आर्थिक मदत करावी असे आवाहन पत्रकार शंकर जाधव यांनी केले आहे. तरी रामेश्वरी शंकर जाधव यांचा भारतीय स्टेट बँक खाते नंबर 42664727948,आय एफ सी कोड नं.एस बी आय एन 0004756 यावर किंवा फोन पे नंबर 9975611775 यावर आर्थिक मदत करण्याचे आवाहन केले आहे.



श्रेया शंकर जाधव थॅलेसेमिया मेजरने ग्रस्त आहे आणि 6 महिन्यांपासून नियमित बायोड ट्रान्सफ्युजन घेत आहे. या स्थितीसाठी एकमेव उपचारात्मक पर्याय म्हणजे बोन मॅरो ट्रान्सप्लांटेशन (बी एम टि). आम्ही कुटुंबाला एच एल ए टायपिंग ऑफर केले आणि ते हॅप्लोइडेंटिकल वडिलांशी मॅच असल्याचे आढळले. प्रत्यारोपणासाठी निवडलेल्या वडिल शंकर जाधव दात्याने दान केलेल्या बोन मॅरोचा वापर करण्याची आमची योजना आहे. प्रत्यारोपण केले जात आहे. सहाय्यक संकल्प इंडिया फाउंडेशन कडून ना-नफा तत्वावर पॅलेंटला ही सेवा देण्यात आली आहे. प्रत्यारोपणाचा एकूण खर्च सुमारे १५,००,००० रुपये असेल (फक्त पंधरा लाख रुपये). खर्चात हे समाविष्ट आहे: प्रत्यारोपणापूर्वीचे काम औषधे आणि डिस्पोजेबल,निदान,खोलीचे शुल्क ज्यामध्ये डॉक्टरांचे शुल्क, नर्सिंग शुल्क, बॉडी शुल्क, जेवणाचे शुल्क आणि इतर विविध हॉस्पिटलायझेशन शुल्क समाविष्ट आहे.प्रक्रिया शुल्क प्रत्यारोपणानंतरचा पाठपुरावा प्रत्यारोपणासाठी हा एक पॅकेज खर्च आहे आणि जीवघेणा संसर्ग झाल्यास वाढू शकतो कारण प्रत्यारोपणादरम्यान संसर्गावर उपचार करण्यासाठी वापरले जाणारे एजंट महाग असतात. प्रक्रियेसाठी आवश्यक असलेले पैसे तयार होताच आम्ही मुलाला प्रत्यारोपण करण्याची योजना आखत आहोत. कोणत्याही प्रश्नाच्या बाबतीत कृपया माझ्याशी संपर्क साधावा
डॉ. डि. एम.मोहना रेड्डी ( बेंगलोर )

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mo-

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com